# मेट्रो-३च्या चाचणीला सुरुवात

**मुंबई (वार्ताहर) :**



कुलाबा-वांद्रे-सिप्झ मार्गावरच्या मेट्रो-३च्या चाचणीला मंगळवारपासून सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाचणीसाठी हिरवा झेंडा दाखवला. 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' या मुंबईतील पहिल्यावहिल्या भुयारी मेट्रो प्रकल्पाअंतर्गत मंगळवारी प्रथमच भुयारी मार्गावरून मेट्रो धावली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्या मेट्रो गाडीला हिरवा झेंडा दाखविला आणि सारिपूत ते मरोळ असा तीन किमींचा पल्ला या मेट्रो गाडीने गाठला.

मेट्रो लाइन-३ ची वैशिष्ट्ये

मुंबई मेट्रो लाइन-३ च्या ट्रेन्स ८ डब्यांच्या असतील. ७५ टक्के मोटोरायसेशनमुळे गाड्यांच्या धावण्याची कार्यक्षमता उत्तम राहील. रिजनरेटिव्ह ब्रेकिंगमुळे सुमारे ३० टक्के विद्युत ऊर्जेची बचत होईल आणि चाकांची तसेच ब्रेक ब्लॉक्स इत्यादी उपकरणांची झीज कमी होईल. एका गाडीतून अंदाजे २४०० प्रवासी प्रवास करू शकतील. ८५ किमी प्रतितास अशा प्रत्यक्षातील प्रचालन वेगामुळे प्रवाशांचा एकूण प्रवासासाठी लागणारा वेळ कमी होईल. स्टेनलेस स्टीलच्या वापरामुळे मेट्रोचे डबे किमान ३५ वर्षे टिकू शकतील. ट्रेन प्रचालनसाठी चालक विरहित प्रणाली स्वीकारली असून अत्याधुनिक कम्युनिकेशन बेस्ड ट्रेन कंट्रोलच्या सिग्नल व्यवस्थेमुळे १२० सेकंदची फ्रिक्वेन्सी ठेवणे शक्य होणार आहे. प्रवाशांच्या सुलभतेसाठी डब्याच्या प्रत्येक बाजूला चार दरवाजे असतील. स्वयंचलित प्रकाश नियंत्रण वैशिष्ट्यासह अद्ययावत वीज प्रणाली ऊर्जेचा वापर कमी करण्यास मदत करेल.